मेट्रो रेल्वे स्थानकांचे नामकरण/ पुनर्नामकरण करण्याबाबत केंद्रशासनास शिफ़ारस करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२६/प्र.क्र. १०१/नवि-७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १८ नोव्हेंबर, २०२६.

संदर्भ : १) गृहनिर्माण व नागरी व्यवहार मंत्रालय, भारत सरकार सा.का.नि. क्र. १७६ (अ) दि. १२ मार्च, २०२६ रोजीची अधिसूचना.

२) शासन परिपत्रक क्र. एमआरडी-३३२४/प्र.क्र. १८/नवि-७ दि. २३ फ़ेब्रुवारी, २०२४.

प्रस्तावना :-

भारत सरकारच्या गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालयाने निर्गमित केलेल्या अधिसूचना क्र. सा.का.नि. १७६ (अ), दिनांक १० मार्च, २०२६ द्वारे लागू केलेल्या 'मेट्रो रेल (स्थानकांचे नामकरण किंवा पुनर्नामकरण) नियम, २०२६' मधील नियम ३ (१) मधील तरतुदींनुसार मेट्रो रेल प्रणालीच्या स्थानकांचे नामकरण किंवा पुनर्नामकरण करण्यासाठी समिती स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

०२. शासन निर्णय :-

मेट्रो रेल (स्थानकांचे नामकरण किंवा पुनर्नामकरण) नियम, २०२६ मधील नियम ३ (१) अन्वये प्राप्त झालेल्या शक्तींचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे मुंबई महानगर प्रदेश/ पुणे महानगर प्रदेश /नागपूर महानगर प्रदेश येथील मेट्रो रेल स्थानकांच्या नामकरणासाठी आणि पुनर्नामकरणासाठी केंद्र शासनाकडे शिफारशी सादर करण्याकरिता खालील सदस्यांची "मेट्रो रेल्वे स्थानक नामकरण व पुनर्नामकरण समिती" गठित करण्यात येत आहे:

अ) समितीची रचना:

अ.क्र.	सदस्य	पदनाम
१.	मा. मुख्यमंत्री	अध्यक्ष
२.	मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास)	सह-अध्यक्ष
३.	संबंधित क्षेत्रातील लोकसभा सदस्य	सदस्य
४.	संबंधित क्षेत्रातील विधानसभा सदस्य	सदस्य
५.	संबंधित क्षेत्रातील महानगरपालिका/प्राधिकरण/विशेष नियोजन प्राधिकरण इ. स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी (महापौर/अध्यक्ष)	सदस्य
६.	संबंधित मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी संस्थेचे प्रशासकीय प्रमुख	सदस्य-सचिव

ब) समितीच्या मार्गदर्शक सूचना व अटी (Terms of Reference):

'मेट्रो रेल (स्थानकांचे नामकरण किंवा पुनर्नामकरण) नियम, २०२६' मधील नियम ३ (२) नुसार, स्थानकांचे नामकरण किंवा पुनर्नामकरण करताना समितीने खालील बाबींचा गांभीर्याने विचार करणे बंधनकारक राहील:

१) सांस्कृतिक वारसा, ऐतिहासिक आणि भौगोलिक महत्त्व.

२) समान किंवा एकाच प्रकारच्या नावांचा गोंधळ टाळणे.

३) स्थानिक जनता आणि भावनांचा आदर.

४) नाव उच्चारण्यास सोपे असणे व भौगोलिक स्थानाशी सुसंगत असणे (व्यावहारिक सुलभता).

५) कोणत्याही प्रकारचा वाद टाळून प्रतीकात्मक प्रतिनिधित्व (नेते किंवा देवता) यांचा समतोल साधणे.

६) परिसराच्या ओळखीशी स्पष्टता व सुसंगतता राखणे.

क) मेट्रो स्थानक नामकरण/पुनर्नामकरण प्रक्रिया व कार्यपद्धती:

१) मेट्रो रेल्वे व्यवस्थापन संस्था / अंमलबजावणी संस्था मेट्रो रेल्वे स्थानकांच्या नामकरणाबाबत/ पुनर्नामकरणाबाबत प्राप्त निवेदनांबाबत उपरोक्त-ब मध्ये नमूद बाबी तपासून नामबदलांबाबत स्वयंस्पष्ठ अभिप्रायासह प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर करील.

२) सदर प्रस्ताव नगर विकास विभागामार्फ़त समितीच्या विचारार्थ सादर करण्यात येईल.

३) समिती सदर मेट्रो रेल्वे स्थानकांच्या नामकरणाबाबत/पुनर्नामकरणाबाबत केंद्र शासनाकडे शिफ़ारशी करण्याबाबत निर्णय घेईल.

४) समितीच्या शिफ़ारशींनुसार नगर विकास विभागामार्फ़त प्रस्ताव गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालयाने निर्गमित केलेल्या अधिसूचना क्र. सा.का.नि. १७६ (अ), दिनांक १० मार्च, २०२६ द्वारे लागू केलेल्या 'मेट्रो रेल (स्थानकांचे नामकरण किंवा पुनर्नामकरण) नियम, २०२६' मधील नियम ३ (३) नुसार केंद्र शासनाकडे सादर करण्यात येईल.

०३. राज्यातील मेट्रो रेल्वे स्थानकांचे नामकरण करणे, नावात बदल करण्याच्या अनुषंगाने मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी संस्थेने त्यांचे स्तरावर निर्णय घेण्याच्या अनुषंगाने समिती स्थापित करण्याबाबत निर्गमित करण्यात आलेले संदर्भ क्र. २ येथे नमूद दि. २३/०२/२०२४ रोजीचे शासन परिपत्रक या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१११८१८१५२७९६२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E1FEEA176A1E6A273C5748B6F1A1ED8588F87424188CCD6EE073405817 33B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.11.18 18:16:44 +05'30'

(विजय चौधरी)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४. मा. उप मुख्यमंत्री (रा.उ.शु., क्रि. व यु. क. आणि अ. क.) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

५. मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
७. अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
८. अपर मुख्य सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
९. व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि., मुंबई.
१०. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई.
११. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.(महामेट्रो), नागपूर/पुणे/ठाणे.
१२. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, शहरे व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (सिडको), नवी मुंबई.
१३. महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.
१४. व्यवस्थापकीय संचालक, महा मुंबई मेट्रो संचलन महामंडळ मर्यादित, मुंबई.
१५. निवड नस्ती (नवि-७).